# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३६७/२०२४ दिनांक ०३/१०/२०२४

## प्रेस नोट

**" बुरखा परिधान करुण रात्रीच्यावेळी फिर्यादी यांच्या घरात घूसुन त्यांना प्लॅस्टीकच्या बंदूकीचा धाक दाखवून त्यांच्या घरातुन १०,००,०००/रु रोख रक्कम जबरीने चोरी करुण पळुन गेलेल्या ०३ आरोपीतांना नालासोपारा येथुन अटक करुण त्यांच्याकडुन १०,००,०००/ रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात काशीगाव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश. "**

दि. ३०.०९.२०२४ रोजी फिर्यादी **नामे मोहम्मद आदिल इलियास अहमद, रा.ठि** काशिगांव मिरा रोड पुर्व, यांनी समक्ष काशिगाव पोलीस स्टेशनला हजर राहून तक्रार दिली की, दिनांक ३०.०९.२०२४ रोजी पहाटे ०४.०० वा. सुमारास फिर्यादी यांचा **मोठा भाऊ इप्तिहार इलियास अहमद व लहान भाऊ अतिक अहमद** हे नेहमी प्रमाणे त्यांच्या व्यवसायातील दुधाच्या गाड्या खाली करण्या करीता निलकमल नाका, काशिमिरा येथे गेले होते काही वेळात साधरण ०४.३० वा. सुमरास फिर्यादी आदिल इलियास अहमद व त्यांची पत्नी हे घरात झोपलेले असतांना कोणीतरी अनोळखी इसमाने त्यांचा दरवाजा ठोठावला असता फिर्यादी यांच्या पत्नीने घराचा दरवाजा उघडला असता अचानक त्यांच्या घरामध्ये **काळ्या रंगाचा बुरखा परिधान केलेले दोन अनोळखी इसम व एक बुरखा परिधान केलेली अनोळखी महिला असे घरात घुसले** व फिर्यादी व त्यांच्या पत्नीला मारहाण व दमदाटी केली व त्यातील एका बुरखा परिधान केलेल्या इसमाने त्यांच्याकडे **असलेली प्लॅस्टीकची बंदुक फिर्यादी यांना दाखवुन त्यांना** खाली जमीनीवर पाडुन फ्लॅस्टीकची बंदुक फिर्यादी यांच्या तोंडात कोंबुन त्यांना मारहाण केली व यातील एका बुरखा परिधान केलेल्या इसमाने घरात बेडरुम मध्ये फिर्यादी यांच्या व्यवसायातील रोख रक्कम घेतली त्यानंतर ते तिघेही अनोळखी इसमांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला मारहाण व दमदाटी करुण ते त्या ठिकाणाहून पळून गेले म्हणुन सदर घडलेल्या प्रकारा बद्दल फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन काशिगाव पोलीस स्टेशन गु.रं.नं ३१७/२०२४ बि.एन.एस ॲक्ट ३०९(६),६०५,३५२,३५१,६१(२) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा नोंद केला होता.

नमुद दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवुन दाखल गुन्हा उघड करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे काशिगाव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे बारकावे तपासून व घटनास्थळी तीन अनोळखी इसम बुरखा परिधान करुण चोरी करुण ऑटो रिक्षा मध्ये बसुन जात असतांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसुन आले. घटनास्थळाचे तसेच आजूबाजूचे व आरोपी येण्या जाण्याच्या मार्गावरचे असे २० पेक्षा जास्त ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज चेक करुण नमुद आरोपीतांनी गुन्ह्यात वापरलेली हुंदाई कंपनीची वेरणा कारचा नंबर निष्पन्न केला व त्या आधारे आरोपीतांचा शोध घेवून नमुद गुन्ह्यात आरोपी नामे १) **जुबेर फुरखान शेख**,वय २१ वर्षे पत्ता-स्टार बिल्डींग, बुरहाण

चौक,नालासोपारा पश्चिम, पालघर २)**कामरान इसहाक शेख**,वय १९ वर्षे,पत्ता-स्टार बिल्डींग, बुरहाण चौक, नालासोपारा पश्चिम, पालघर **व महिला आरोपी** यांना दिनांक ०१.०१०.२०२४ रोजी नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

नमुद अटक आरोपी हे फिर्यादी यांचे नातेवाईक असुन यांतील आरोपी **कामरान शेख** याने यापुर्वी फिर्यादी व त्यांच्या भावांच्या दुधाच्या व्यवसायात त्यांच्या सोबत काम केले असुन त्याला फिर्यादी यांच्या घरात रोज व्यवसायातील रोख रक्कम ठेवली असल्याची माहीती असल्याने त्याने गुन्ह्याच कट रचुन त्यांनी नमुद गुन्हा संगणमताने केला  असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**अटक आरोपी यांच्याकडुन नमुद गुन्ह्यात त्यांनी जबरीने चोरी करुण घेतलेले १०,००,०००/ रु.रोख रक्कम (अक्षरी दहा लाख रुपये),  गुन्हा करतांना  आरोपीतांनी परिधान केलेले काळ्या रंगाचे बुरखे, फिर्यादी यांना धमकवण्यासाठी वापरलेली प्लॅस्टीकची बंदुक व गुन्ह्यात वापरलेली हुंदाई कंपनीची एम.एच. ०४, जी.यु.७८९३ ही वरणा कार इत्यादी मद्देमाल त्यांच्याकडुन हस्तगत करण्यात आला आहेत**

अटक आरोपी हे दिनांक ०४.१०.२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असुन नमुद गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, किरण बगडाणे, अभिजीत लांडे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे,सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग,राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिगांव पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली **काशिगांव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.**

----000----